महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४५ वा | दिनांक : २९/११/२०२५ | वार : शनिवार

# महायुतीत २ डिसेंबरनंतर फूट पडणार का? मंत्री नाईक



**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने सत्ताधारी शिवसेना व भाजपमधील राजकीय कटूता वाढल्याचे चित्र आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपल्याला कोणत्याही स्थितीत 2 डिसेंबरपर्यंत महायुती टिकवायची आहे असे विधान केल्यानंतर आता मंत्री गणेश नाईक यांनीही शिवसेनाला ढकलण्यासंबंधीचे विधान केले आहे. त्यामुळे सत्ताधारी महायुतीत 2 डिसेंबरनंतर फूट पडणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शिवसेना आमदार नीलेश राणे यांनी बुधवारी भाजपचे मालवण स्थित पदाधिकारी विजय किनवडेकर यांच्या घरी धाड टाकली होती. त्यात त्यांच्या हाती पैशाची थैली लागली होती. हा पैसा भाजपने मतदारांना वाटण्यासाठी आणल्याचा आरोप त्यांनी केला होता. पत्रकारांनी याविषयी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना छेडले असता त्यांनी आपल्याला 2 डिसेंबरपर्यंत युती टिकवायची आहे असे नमूद करत त्यावर भाष्य करणे टाळले. मला 2 डिसेंबरपर्यंत युती टिकवायची आहे. त्यानंतर मी नीलेश राणे यांना उत्तर देईन. मी आता त्यावर काहीही बोलणार नाही. नंतर बोलेन. पण नीलेश राणे जे बोलत आहेत ते खोटे आहे, असे ते म्हणाले.

त्यांच्या या विधानानंतर सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी मित्रपक्षांना एकमेकांविषयी बोलताना तारतम्य बाळगण्याचा सल्ला दिला. मित्र पक्षांनी एकमेकांविषयी बोलताना तारतम्य बाळगले पाहिजे. एकमेकांविषयीची आचारसंहिता पाळली पाहिजे. आमची केंद्रात व राज्यातही युती आहे. एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच प्रचारात एकमेकांवर खालच्या पातळीवर टीका न करण्याचा सल्ला दिला आहे. आत्ता रवींद्र चव्हाण काय म्हणाले हे मला माहिती नाही. पण ते असे बोलले असतील तर पुढेही युती टिकवायची आहे का? असे ते म्हणाले.

भाजपचे मंत्री गणेश नाईक यांनीही या वादावर सूचक विधान केले आहे. ते म्हणाले, रवींद्र चव्हाण हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष आहेत. ते बोलण्याच्या ओखात चुकून बोलले असतील. त्याला गांभीर्याने घेण्याची गरज नाही. आम्हाला राज्यातील जनतेचा विकास करायचा आहे. जनतेची कामे करताना भाजपचा झेंडा फडकवायचा आहे. गाडीत बसताना अडचण झाली तरी आम्ही ॲडजेस्ट करू. पण उद्या तुम्ही आम्हाला ढकलणार असाल तर आम्हीही पुढे कोण कुणाला ढकलते ते पाहू, असे ते म्हणालेत. गणेश नाईक यांच्या या विधानामुळे महायुतीत सर्वकाही ठिकठाक नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# संसदेत वंदे मातरम म्हणण्यावर बंदी : उद्धव ठाकरे



**मुंबई :** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने संसद भवनात वंदे मातरम म्हणण्यावर बंदी घातल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. सरकारने संसदेत वंदे मातरम म्हणण्यास मनाई करणारी अधिसूचना जारी केली आहे. ही काय गोष्ट आहे? यामागे कुणाचे डोके आहे? माझे खासदार संसदेत जाऊन वंदे मातरम म्हणतील. भाजपमध्ये हिंमत असेल तर त्यांनी त्यांना बाहेर काढून दाखवावे, असे ते म्हणाले. भाजपचे हिंदुत्व ढोंगी आहे. भाजपचे मुंह में राम बगल में अदानी, असल्याचा टोलाही उद्धव ठाकरे यांनी लगावला. अदानी हा शब्द कॉन्ट्रॅक्टरचा प्रतीक झालाय, अशी पुस्तीही त्यांनी जोडली. कुंभमेळ्याचे कारण सांगून नाशिकमध्ये वृक्षतोडीचा घाट घातला जातोय. ही जागा कॉन्ट्रॅक्टरच्या घशात घातली जातेय, असा आरोपही त्यांनी केला.

उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले, राज्यात सध्या निवडणुकांचे वातावरण आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह त्यांचे सर्वच सरकार प्रचारासाठी फिरत आहेत. गावोगावी किंवा जिथे कुठे निवडणूक आहे, तिथे जाऊन मते मागत आहेत. या निवडणुकीत केवळ पैशांचा धूर निघताना दिसत आहे. पैशांचे वाटप किंवा पैशाचा पाऊस किंवा अतिवृष्टी ही महाराष्ट्रात भयानक पद्धतीने सुरू आहे. एकप्रकारचा सत्तेचा माज व सत्तेचा दर्प या सर्व राजकर्त्यांच्या वक्तव्यातून व त्यांच्या वागणुकीतून महाराष्ट्र पाहत आहे.

मी 8-10 दिवसांपूर्वी मराठवाड्यातील शेतकऱ्यांमध्ये जाऊन बसलो होतो. त्यांच्या वेदना, व्यथा समजून प्रयत्न केला. त्यांना धीर दिला. त्यानुसार एकही मंत्री शेतकऱ्यांमध्ये जाऊन बसत नाही. नागरिकांशी बोलत नाही. फक्त जिथे जातात तिथे पैशांच्या थैल्या उधळून मते मागितली जात आहेत. हे चित्र फार भयानक आहे.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी सरकारने संसदेत वंदे मातरम म्हणण्यावर बंदी घालणारी अधिसूचना जारी केल्याचाही दावा केला. ते या प्रकरणी पीएम मोदी व भाजपवर निशाणा साधत म्हणाले, संसदेत वंदे मातरम म्हणू शकत नाही. ही काय गोष्ट आहे? यामागे कुणाचे डोके आहे? कधीकाळी भाजपचेच लोक ओरडून सांगत होते की, या देशात राहायचे असेल तर वंदे मातरम म्हणावे लागेल. माझे खासदार तिथे जाऊन वंदे मातरम म्हणतील. भाजपमध्ये हिंमत असेल तर त्यांनी माझ्या खासदारांना बाहेर काढून दाखवावे. हिंमत नसेल तर ही गोष्ट कुणी केली त्याला समोर आणावे. त्याला पाकिस्तानात पाठवा. हा भाजपचा दुटप्पीपणा आहे. ढोंगीपणा आहे. ते हिंदूही नाहीत आणि देशप्रेमीही नाहीत.

# राज्य प्रशासनात मोठा बदल; महाराष्ट्राला नवे मुख्य सचिव, राजेश अग्रवाल यांची नियुक्ती

**मुंबई :** महाराष्ट्राच्या प्रशासकीय नेतृत्वात मोठा बदल होत असून वरिष्ठ आयएएस अधिकारी राजेश अग्रवाल यांची राज्याच्या नव्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात येत आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या मागणीनुसार त्यांना केंद्रातील कामकाजातून राज्याकडे परत पाठवले असून आता ते राज्य प्रशासनातील सर्वात वरिष्ठ अधिकारी म्हणून पदभार स्वीकारतील. सध्याचे मुख्य सचिव राजेश कुमार मीणा यांची मुदत 30 नोव्हेंबरला संपत आहे आणि त्यानंतर अग्रवाल ही जबाबदारी सांभाळतील अशी अधिकृत माहिती समोर आली आहे.

राजेश अग्रवाल हे 1989 च्या तुकडीतील आयएएस अधिकारी असून तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे विशेष कौशल्य ओळखले जाते. आयआयटी दिल्ली येथून संगणक अभियांत्रिकीतील बी.टेक. पदवी मिळविल्यानंतर ते प्रशासनात दाखल झाले. राज्यात त्यांनी अकोला व जळगावचे जिल्हाधिकारी, तसेच मुंबई महापालिकेत उपआयुक्त म्हणून काम पाहिले आहे. राज्याच्या अर्थ व आयटी विभागात त्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा राबवल्या. याच अनुभवाच्या जोरावर केंद्रातही त्यांनी अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय योजनांमध्ये योगदान दिले आहे.

केंद्रात तैनात असताना अग्रवाल यांनी आधार, जनधन योजना, डिजिलॉकर, सामाजिक न्याय विषयक डिजिटल उपक्रम अशा प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कामामुळे देशातील डिजिटल प्रशासनाला गती मिळाली. सध्या ते सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या अपंग कल्याण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांचे राज्यात पुनरागमन होताच ते मुख्य सचिवपदाचे स्वाभाविक दावेदार ठरले.

राजेश अग्रवाल 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत सेवेत राहणार

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत मुख्य सचिवपदावर अल्पकाळासाठी नियुक्त्या होत असल्याचे चित्र दिसले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवृत्ती मुदती आणि प्रशासनातील वरिष्ठतेचे समीकरण यामुळे हे पद वारंवार बदलत गेले. पण राजेश अग्रवाल 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत सेवेत राहणार असल्याने त्यांना जवळपास एक वर्षाहून अधिक कार्यकाल मिळेल. त्यामुळे दीर्घकालीन योजना राबविण्यास आणि राज्य प्रशासनाला स्थैर्य देण्यास त्यांचा कार्यकाळ उपयुक्त ठरेल, असे सूत्रांचे मत आहे.

या नियुक्तीमुळे अतिरिक्त मुख्य सचिव (गृहमंत्री) आई. एस. चहल यांची मुख्य सचिव होण्याची संधी पुन्हा हुकली आहे. चहल हे देखील 1989 बॅचचे अधिकारी असून यापूर्वीही मीणा यांना मुदतवाढ मिळाल्याने ते या पदापासून दूर राहिले होते. आता अग्रवाल यांना प्राधान्य देण्यात आल्याने चहल तसेच भूषण गगरानी, अनिल डिग्गीकर, दीपक कपूर, ओपी गुप्ता यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही संधी कमी झाली आहे, कारण त्यांची निवृत्ती अग्रवाल यांच्या आधी होणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ नोव्हेंबर २०२५


# जिंतूरात मतदारांचा उमेदवारांना दिलासा गाठी भेटीवर भर

**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** येथील नगरपरिषद निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट झाल्यानंतर आता उमेदवार मतदारांच्या घरी दत्त म्हणून हजेरी लावताना दिसून येतात .मतदार ही येणाऱ्या प्रत्येक पक्षांचे उमेदवाराला मनातली भावना कळू न देता साहेब ...आम्ही तर तुमचेच आहोत ना मग चिंता कशाला करताय आम्ही तर तुमचेच आमच्याकडे भेटीला आले नाही तरी आम्ही मतदान तुम्हालाच करणार असा दिलासा मतदार देत असल्याचे समजते . मतदानांच्या निकाला नंतर कोण मतदार कुणाच्या बाजूने आहेत हे समजेल प्रचाराला केवळ काही दिवस असल्याने सर्व उमेदवारांनी प्रचार, गाठी भेटी घेत आहेत. येथील नगरपरिषद निवडणूक तब्बल सहा वर्षानंतर होत असल्याने सर्वच पक्षातील कार्यकर्ते अति उत्साही आहेत प्रारंभी पक्षांच्या वरिष्ठाकडे उमेदवारी मिळवण्यासाठी फिल्डिंग लावावी लागली अनेक खाज खळगे पार करून कसे बसे टीकीट पदरात पाडून घेतल. निवडणुकींचे अंतिम चित्र स्पष्ट झाल्याने प्रत्येक उमेदवाराचा प्रभागातील मतदारांच्या भेटीगाठी मतदारांच्या अंगणात दत्त म्हणून हजर राहत आहेत. सोबत काही महिला व कार्यकर्ते घेऊन शक्ती प्रदर्शन करत आहे. मला पक्षाने आपल्या प्रभागात उमेदवारी दिली आहे आमच्याकडे लक्ष असू द्या एक वेळ तुमची सेवा करण्याची संधी द्यावी अशी विनवणी केली जात असून मतदारांच्या चरण स्पर्श सुद्धा करतांनी उमेदवार दिसून येतात. चाणक्य मतदारही आता सावध झाले असून येणाऱ्या प्रत्येक पक्षांचे उमेदवाराला नाराज न करता अहो साहेब.. आम्ही तर तुमचेच आहोत तुम्ही आमच्याकडे नाही आले तरी आम्ही वोटिंग तुम्हालाच करणार आहोत. तुमच्याशिवाय कुणालाही मत देणार नाही. तेव्हा अजिबात आमची चिंता करू नका असा ठाम विश्वास देतानां दिसत आहेत. मतदाराकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे काही क्षण उमेदवार भारावून जात असून आपणच निवडून येणार अशा अविर्भावात सर्वच उमेदवार दिसून येत आहे. कोण कुणाच्या बाजूने कौल देतील यांचा अंदाज आत्ताच स्पष्ट सांगू शकत नाही प्रचाराला केवळ काही दिवसच मिळाल्याने सर्व उमेदवारांनी प्रचार आघाडी घेतली आहे. सभा बैठका गाठीभेटीवर भर दिला जात आहे.

**पार्ट्या रंगू लागल्या**

निवडणूक म्हटल की खर्च अपेक्षित आहे. त्यातच मतदारांची मर्जी सांभाळावी लागते त्यासाठी खिसा गरम ठेवावा लागतो. एरवी देशी दारू पिऊन चटणी भाकरीवर भुक भागवणारे इंग्लिश दारू मटणावर तावमारताना दिसून येत आहे. मतदारांची मर्जी सांभाळताना पुढाऱ्यांच्या नाकी नऊ येत आहेत.

# श्री संचारेश्वर विद्यालयात संविधान दिन उत्साहात संपन्न



**जिंतूर (बी.डी. रामपूरकर ) :** भारतीय संविधान दिनानिमित्त प्रथमतः भारतमाता, डाॅ बाबासाहेब आंबेडकर व संविधान प्रस्ताविका या प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून शिवाजी सोमोसे, प्रमुख पाहुणे म्हणून संजय गायकवाड उपस्थित होते. सर्व शिक्षकवृंदांनी संविधान प्रस्ताविकेचे वाचन केले. तसेच नाट्यस्वरूपात शिक्षकवृंदांनी मूलभूत हक्क कोणते आहेत याबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर भारताचे संविधान कसे निर्माण झाले. संविधान सभा कशी व का तयार करण्यात आली. याबद्दल शिवाजी सोमोसे यांनी आपले विचार प्रकट केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक वृंद किरण नाईक , संजय गायकवाड, बाळासाहेब ठोंबरे, विवेक मुक्कावार ,वर्षा गणगे, प्रल्हाद वैरागर , विजयमाला फड, रूपाली सोनसळे, शिशुवाटिकेतील मोनिका घोडके, राणुबाई सुग्रामकर ,अश्विनी पांडे यांनी परिश्रम घेतले.






# भाजपच्या उमेदवारासाठी संपदा पाटील यांचे डोर टू डोर झंझावाती प्रचार...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :७,** नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मुरूम नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी भाजपचे अधिकृत उमेदवार बापूराव पाटील निवडणूक मैदानात उतरले आहेत, मुरूम भाजप प्रचारात संपदा शरण पाटील, श्वेताताई बापूराव पाटील यांचे डोर टू डोर झंझावती प्रचार सुरु आहे, दि. २७ रोजी मुरूम येथील प्रभाग १ मधील सिद्धयप्पा मंदिरातील शिवलिंग पूजनाने डोर टू डोर प्रचाराला सुरुवात झाला याप्रसंगी असंख्य महिला भगिनाचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद प्रचारात दरम्यान मिळत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ नोव्हेंबर २०२५


## विकासाच्या मुद्द्यावर आम्ही निवडणुका लढतोय-बापूराव पाटील





**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** स्थानिक स्वराज्य संस्थाच्या नगर परिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचा लक्ष मुरूम नगर परिषदेकडे लागले आहेत आणि त्याला कारण ही तसे आहे माजी मंत्री तथा भाजप लातूर ग्रामीण जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांचे बंधू बापूराव पाटील मुरूम नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक मैदानात उतरले आहेत, ५० वर्षापासून पाटील परिवाराने विकासाची कास धरून मुरूम शहराची सेवा केली आहे, यापूढेही भरगोष विकास कामे करण्यासाठी मी निवडणूक मैदानात उतरलो आहे असे मत बापूराव पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केले, विरोधकांच्या अवहान कडे कसे पाहता या प्रश्नला उत्तर देताना पाटील म्हणाले मी ते अवहान समजत नाही कारण अवहान समजण्या सारखे विरोधक नाहीत, सर्व पक्ष तुमच्या विरोधात आहेत या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले ही मुरूम शहराची पूर्वीपासूनचे प्रथा आहे पाटील परिवार विरुद्ध सर्व पक्ष असेच निवडणूक होत असतात, पुढील व्हिजन काय असणार..? भविष्यात वाढत्या शहरीकरणामुळे उच्च दबाचे पाणी पुरवठा, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नगर परिषद अंतर्गत स्पर्धा परीक्षेचे अभ्यासिका, बेनितुरा मध्यम प्रकल्प तलावा शेजारी पर्यटन स्थळ यासह विविध विकासत्मक धोरण राबविणार असल्याचे सांगितले, निवडणुकीत कितपत यश मिळणार? निवडणूकीत २१ च्या २१ उमेदवार निवडून येणार १०० टक्के यश भाजपालाच मिळणार असे विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## "कष्टाच्या वाटा" ला तातोबा पोवार बालसाहित्य पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर :- (प्रतिनिधी)** कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथील वीणापाणि फाऊंडेशनच्या वतीने 2023-24 यावर्षातील अतिशय दर्जेदार व आशयघन प्रतिभासंपन्न बालसाहित्य असलेल्या "कष्टाच्या वाटा" ला "तातोबा ड. पोवारस्मृती बालसाहित्य पुरस्कार " यंदा मराठवाड्याचे प्रसिध्द बालकवी तथा बालभारतीच्या पाठयपुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगावकर यांना मिळाला आहे. असे वीणापाणि फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. आर. बी. जठार आणि उपाध्यक्ष श्री. ए. वाय. इंदुलकर तसेच जठार क्लासेसचे संस्थापक श्री. बा. स. जठार यांनी मोबाईलद्वारे अय्युब पठाण यांना कळविले आहे. या पुस्काराचे स्वरूप रोख अकराशे रूपये हे गुगल पेवर पाठवून दिले असून सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह पोस्टाने पाठविले आहे. हा सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याने अय्युब पठाण लोहगांवकर यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## "क्रांती सूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांचा समतावादी पुरोगामी वैचारिक वारसा युवा पिढीने अंगीकरावा" जेष्ठ समीक्षक आणि विश्लेषक डॉ. प्रशांत राऊत







**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील):** " क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समतावादी आणि पुरोगामी विचारांचा वारसा आजच्या युवा पिढीने समजून घ्यावा आणि कृतिशील व्हावे. प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेत जातीयवादी, वर्चस्व वादी आणि विषमता वादी विचार पसरविणाऱ्या धर्मांध प्रवृत्तीला लगाम लावायचा असेल तर सर्वधर्मियांनी आणि पुरोगामी विचार वंतांनी एकत्र येऊन लढा देण्याची आज गरज आहे. अन्यथा हा देश वैचारिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. म्हणून महात्मा फुले प्रणित सत्य शोधक चळवळ ही आजच्या काळाची गरज आहे.

सध्या देशामध्ये बुवाबाजी, अंधश्रद्धा आणि समाज विघातक विषमता वादी विचारांचे आणि कृतिचे पेव फुटलेले आहे. संविधान मूल्ये आणि लोकशाही आपली ओळख विसरत चालली आहे. आजच्या युवा पिढीने समाज माध्यमाच्या आहारी जाऊ नये तर त्यांनी सत्यशोधक बनावे आणि संविधान विरोधी आणि धर्मांधशक्ती च्या विरोधात पेटून उठले पाहिजे " असे प्रबोधन पर विचार जेष्ठ समीक्षक आणि साहित्यिक डॉ. प्रशांत राऊत त्यांनी मांडले. ते डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे संविधान महोत्सव समारोप सत्रात 'क्रांती सूर्य महात्मा फुले यांचा सत्य शोधक समाज आजच्या काळाची गरज' यावर आयोजित व्याख्यानाचे प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते.

यावर पुढे बोलताना "महात्मा ज्योतिबा फुले यांनी बहुजनांना भट शाही आणि पाखंडी परंपरा आणि रूढीवादी ग्रंथसाहित्या पासून वाचविण्यासाठी सत्याचा शोध आणि वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवणारा सत्यशोधक समाज 24 सप्टेंबर 1874 मध्ये स्थापित केला. आजच्या स्थितीत ह्याच सत्यशोधक विचाराची देशाला आणि युवा पिढीला खरी गरज आहे. " असे परखड विचार त्यांनी मांडले.

स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कामठी रोड येथे 22- 28 नोव्हेंबर 2025 दरम्यान संविधान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या महोत्सवाचा समारोप महात्मा फुले यांच्या स्मृती दिनी "क्रांती सूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची सत्यशोधक चळवळ आजच्या काळाची गरज" या व्याख्यानाने संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष पद कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भूषविले. संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष ऍड. श्री. मोहन वासनिक आणि सचिव श्री. मनोज वासनिक यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते संस्थेचे अध्यक्ष ऍड. श्री. मोहन वासनिक आणि सचिव श्री. मनोज वासनिक तर संस्थेच्या सदस्य प्रा. निशा वासनिक आणि सौ. पारिजा वासनिक यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून नूतन आदर्श महाविद्यालय उमरेड येथील मराठी विभागाचे प्राध्यापक व जेष्ठ समीक्षक आणि साहित्यिक डॉ. प्रशांत राऊत प्रसंगी समीक्षक,जेष्ठ भाष्यकार डॉ. प्रशांत राऊत यांचा महाविद्यालयाच्या वतीने शाल आणि सन्मान चिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उप प्राचार्या प्रा. गामिनी मेश्राम, वरिष्ठ महाविद्यालय सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील, डॉ. अमोल दी. मेंढे यांची ही विचार पीठावर उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी क्रांती सूर्य महात्मा फुले यांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

"भारतीय संविधान आजच्या विद्यार्थ्यांना सोप्या आणि सहज पद्धतीने समजून घेता यावे म्हणून महाविद्यालयातर्फे संविधान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विविध स्पर्धाच्या माध्यमातून विद्यार्थांनी संविधान जागृतीचे मोलाचे कार्य केलेले आहे हा ध्यास त्यांनी भविष्यातही सुरु ठेवावा." असे अध्यक्षीय विचार यावेळी कार्य कारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी संविधान महोत्सवा अंतर्गत आयोजित विविध बौद्धीक आणि सांस्कृतिक स्पर्धाचे बक्षीसवितरण मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि प्रशस्ती पत्रे देऊन करण्यात आले. भारतीय संविधान आणि वर्तमान लोकशाहीचे स्वरूप या विषयावरील निबंध स्पर्धेत 42 विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. प्रथम पुरस्कार श्री. विजय चव्हाण, द्वितीय पुरस्कार कु. स्मिता गौरे तर तृतीय पुरस्काराची मानकरी रीमा चहांदे ठरली. भारतीय संविधान आणि महिला सक्षमीकरण यावर आयोजित रांगोळी स्पर्धेत एकूण 17 स्पर्धक सहभागी झाले. प्रथम पुरस्कार श्री. गौरव मसरके, द्वितीय पुरस्कार कु. समीक्षा अक्षरा तर तृतीय पुरस्कार कु. आश्लेषा शर्मा यांना प्रदान करण्यात आला. भारतीय संविधानावर आधारित लेखी प्रश्न मंजुषा स्पर्धेत एकूण 153 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रथम पुरस्कार कु. उषा रवींद्र टेम्भूर्णे, द्वितीय पुरस्काराची मानकरी कु. समीक्षा तेजराम कांबळे तर तृतीय पुरस्कार कु. एन. सि. राय भोयर यांना मिळाला. भारतीय संविधानाची अमृत महोत्सवी वाटचाल यावर पोस्टर मेकिंग स्पर्धेत 21 स्पर्धकांनी भाग घेतला. त्या मध्ये कु. रीमा चहांदे यांना प्रथम पुरस्कार, श्री. गौरव मसरके स द्वितीय पुरस्कार तर कु. उर्वशी जनबंधू यांना तृतीय पुरस्कार बहाल करण्यात आला. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाण पत्राचे वितरण करण्यात आले.

अतिथी व्याख्यान आयोजनामागची प्रमुख भूमिका मांडून अतिथी वक्त्यांचा परिचय सभागृहास डॉ. अमोल दी. मेंढे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. करुणा सावतकर यांनी केले. तर मान्यवरांचे, उपस्थितांचे आणि संविधान महोत्सव यशस्वीते बाबत सर्वांचे आभार संविधान महोत्सव समितीचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी मानले. समारोपीय कार्यक्रमाला वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या परंपरेनुसार कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने संपन्न झाली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ नोव्हेंबर २०२५

# अंजीर मिठाबहार व्यवस्थापनातून उत्पन्न वाढवा डॉ. संजूला भावर



**केसापुरी (प्रा. शिवाजी गायकवाड) :** आज दिनांक 28 नोव्हेंबर 2025 रोजी मौजे केसापुरी या ठिकाणी अंजीर या फळ पिकाबाबत सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले. बागेचे छाटणी व्यवस्थापन शेंडा खुडणे व्यवस्थापन सिंचनाद्वारे खत व्यवस्थापन, कीड , बुरशीजन्य रोग, मार्गदर्शन, औषधी फवारणी तंत्रज्ञान इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन डॉक्टर संजूला भावर विषय विशेषज्ञ उद्यानविद्या विभाग कृषी विज्ञान केंद्र छत्रपती संभाजी नगर यांनी केली. फळपीक विमा मध्ये अंजीर हे पिक समाविष्ट करणे बाबत शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी मेघशाम गुळवे यांना मागणी व विनंती केली.उपस्थित मेघशाम गुळवे तालुका कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर, योगेश दिवेकर उप कृषी अधिकारी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगनाथ पिसाळ सहाय्यक कृषी अधिकारी यांनी केले. पंचक्रोशीतील शेतकरी बांधव शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, उपसरपंच ज्ञानेश्वर पवार,प्रगतशील शेतकरी धोंडीराम निकम , ज्ञानेश्वर सुराशे,गणेश सुरशे निवृत्ती गुंजाळ ,सोपान कळसकर कृषी मित्र विलास जाधव ग्रामपंचायत सदस्य रामभाऊ आदी शेतकरी उपस्थित होते.

# इकरा पब्लिक शाळेत १०० टक्के उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव



**जळगाव :** विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागण्यासाठी काय करता येईल, वर्गातील अध्यापन रंजक कसे येईल आणि विद्यार्थ्यांना शाळा हे दुसरे घर कसे वाटेल, यासाठी शाळेत नवनवीन उपक्रम राबवण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांची उपस्थिती नियमित राहण्यासाठी १०० टक्के हजेरी असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वस्तू व पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.नुकतेच प्रथम सत्र परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले व शाळेत शिक्षक पालक मेळावा घेण्यात आला पालक मेळाव्यात पाचवी ते दहावीचे १००% उपस्थिती असलेलेसालेहा पटेल, शयान मनियार,तमन्ना कौसर,बुशरा मकरानीहस्सान खान आणि सैयद मावीया यांचा विशेष सत्कार करण्यात आला कार्यक्रमास डॉ.नसीर शाह (पंजाब),संस्थेचे अध्यक्ष डॉ. करीम सालार, एजाज मलिक, शेख रशीद व इकरा संस्थेचे सर्व सदस्य उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक शेख शकील म्हणाले की, या उपक्रमामुळे शाळा काही वेगळी भानगड नाहीतर श्वासा इतकीच आपल्या जीवनातील अनिवार्य गोष्ट आहे आणि त्यामुळे शाळेकडे पाठ फिरवणारी मुले शाळेवर आणि शिक्षणावर प्रेम करायला लागावी म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला. सूत्रसंचालन आरीफ खान यांनी केले. यावेळी शिक्षक वृदांसह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य विद्यार्थी व उपस्थित होते.









# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ नोव्हेंबर २०२५


# महात्मा फुले हे आधुनिक मराठी कवितेचे जनक - प्रा.डॉ.भास्कर शिंदे




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे):** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या ग्रंथालय कक्षात आयोजित केलेल्या महात्मा फुले स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बी. आर.शिंदे आणि प्रा.आर.जी. कोळी हे होते.ते पुढे म्हणाले की,"महात्मा फुले हे आधुनिक मराठी कवितेचे जनक असून वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले मराठी लेखक आहेत.खरे तर त्यांच्या विद्रोही साहित्याची म्हणावी तशी दखल मराठी सारस्वत कारांनी घेतली नाही.पण त्यांनी लिहिलेले अखंड हे आधुनिक मराठी कविताच होती.त्यामुळे विद्रोही अशा नवीन आणि आधुनिक विचारांची मांडणी पहिल्यांदा महात्मा फुले यांनीच केली त्यामुळे खऱ्या न्यायाने मराठी आधुनिक कवितेचे जनक तेच ठरतात.विचारवंत आणि समाज सुधारक म्हणूनही त्यांनी आयुष्यभर काम केले .त्यांचे इतिहासिक संशोधन केले.महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या स्वप्नातील समतेवर आधारित असलेल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन त्याची मुहूर्तमेढ रोवली .त्यांनी भारतातील मुलींची पहिली शाळा 1848 साली पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात उघडली .आपल्या पुरोगामी विचारांची निर्भयपणे मांडणी केली व स्वतःचे विचार आचरणात आणले. 23 सप्टेंबर 1873 रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. पुरोहिता कडून होणाऱ्या अन्यायापासून अत्याचारापासून व गुलामगिरीतून तथाकथित शूद्र अति शूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. "सर्व साक्षी जगत्पती ,त्याला नकोच मध्यस्थी," हे समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली सत्यशोधक समाजातर्फे पुरोहितशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहोचविणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वहारांच्या समान हक्क व संधीसाठी महात्मा फुल्यांनी अक्षरशः आपल्या आयुष्याचे रान केले.शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या त्यांच्या कवितेच्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत .विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली ,नितीविना गती गेली ,गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले ,इतके अनर्थ एका अविद्येने केले, खरे तर आज त्यांचा स्मृतिदिन आहे, त्यानिमित्त सर्वांनी विशेषतः तरुण पिढीने आणि मुली व महिलांनी त्यांचे विचार आवर्जून आत्मसात केले पाहिजेत .तरच खऱ्या अर्थाने त्यांचा स्मृतिदिन साजरा केल्याचे समाधान वाटेल, असे मला तरी प्रामाणिकपणे वाटते "असे सांगून डॉ. भास्कर शिंदे यांनी आपल्या व्याख्यानाचा शेवट केला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या प्रतिमेला वंदन करण्यात आले.या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.बालाजी कोनाळे यांनी केले प्राचार्यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाचे सविस्तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले यांनी मांडले.यावेळी महाविद्यालयात बहुसंख्य विद्यार्थी ,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या ग्रंथालय कक्षात आयोजित केलेल्या महात्मा फुले स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बी. आर.शिंदे आणि प्रा.आर.जी. कोळी हे होते.ते पुढे म्हणाले की,"महात्मा फुले हे आधुनिक मराठी कवितेचे जनक असून वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले मराठी लेखक आहेत.खरे तर त्यांच्या विद्रोही साहित्याची म्हणावी तशी दखल मराठी सारस्वत कारांनी घेतली नाही.पण त्यांनी लिहिलेले अखंड हे आधुनिक मराठी कविताच होती.त्यामुळे विद्रोही अशा नवीन आणि आधुनिक विचारांची मांडणी पहिल्यांदा महात्मा फुले यांनीच केली त्यामुळे खऱ्या न्यायाने मराठी आधुनिक कवितेचे जनक तेच ठरतात.विचारवंत आणि समाज सुधारक म्हणूनही त्यांनी आयुष्यभर काम केले .त्यांचे इतिहासिक संशोधन केले.महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या स्वप्नातील समतेवर आधारित असलेल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन त्याची मुहूर्तमेढ रोवली .त्यांनी भारतातील मुलींची पहिली शाळा 1848 साली पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात उघडली .आपल्या पुरोगामी विचारांची निर्भयपणे मांडणी केली व स्वतःचे विचार आचरणात आणले. 23 सप्टेंबर 1873 रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. पुरोहिता कडून होणाऱ्या अन्यायापासून अत्याचारापासून व गुलामगिरीतून तथाकथित शूद्र अति शूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. "सर्व साक्षी जगत्पती ,त्याला नकोच मध्यस्थी," हे समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली सत्यशोधक समाजातर्फे पुरोहितशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहोचविणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वहारांच्या समान हक्क व संधीसाठी महात्मा फुल्यांनी अक्षरशः आपल्या आयुष्याचे रान केले.शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या त्यांच्या कवितेच्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत .विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली ,नितीविना गती गेली ,गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले ,इतके अनर्थ एका अविद्येने केले, खरे तर आज त्यांचा स्मृतिदिन आहे, त्यानिमित्त सर्वांनी विशेषतः तरुण पिढीने आणि मुली व महिलांनी त्यांचे विचार आवर्जून आत्मसात केले पाहिजेत .तरच खऱ्या अर्थाने त्यांचा स्मृतिदिन साजरा केल्याचे समाधान वाटेल, असे मला तरी प्रामाणिकपणे वाटते "असे सांगून डॉ. भास्कर शिंदे यांनी आपल्या व्याख्यानाचा शेवट केला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या प्रतिमेला वंदन करण्यात आले.या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.बालाजी कोनाळे यांनी केले प्राचार्यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाचे सविस्तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले यांनी मांडले.यावेळी महाविद्यालयात बहुसंख्य विद्यार्थी ,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्वप्नातला राक्षस

झोपेत असतांना एकदा
स्वप्नात राक्षस आला
थरथर कापू लागलो
पाहून मी त्याला
धिप्पाड त्याचं शरीर
लांब लांब होते हात
एका घासातच खायचा
हंडा भरून भात
अक्राळ विक्राळ तोंड
सुपासारखे त्याचे कान
माहित नव्हती आंघोळ
अंगाची यायची घाण
वाकडे तिकडे नखं
अनकुचीदार दोन शिंग
भारी विचित्र दिसायचे
तेलकट काळे अंग
मला गाली हसू आले
त्याची मोठी ढेरी पाहून
तसा रागाने आला तो
माझ्याकडे धावून
आई ग! म्हणून मी
जोरात आवाज केला
आई हसून म्हणाली
स्वप्न पडले का तुला?




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ नोव्हेंबर २०२५

# ठक्कर बाप्पा : समाजसुधारणेचे मानवतावादी रूप

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी केवळ नावाने नाही तर त्यांच्या कृतींनी, त्यांच्या जीवनतत्त्वांनी आणि त्यांच्या समाजकार्याच्या विचारधारेमुळे लोकांच्या मनात कायमस्वरूपी जडतात. समाजातील वंचित, पीडित, व दलित घटकांच्या पुनर्वसनासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवणाऱ्या, आयुष्यभर जनसेवा करत राहणाऱ्या, शाळा, वसतिगृहे, उद्योग, वस्ती, रुग्णालये यांची पायाभरणी करणाऱ्या कर्मयोग्यांपैकी एक म्हणजे अर्थातच ठाकुरजी झवेरभाई मोवजीवाला, म्हणजेच संपूर्ण भारताला परिचित असलेले ठक्कर बाप्पा. त्यांचे कार्य सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात इतके व्यापक होते की आजही आदिवासी, भटक्या व विमुक्त जमाती त्यांना देवदूत, समाजपिता, अथवा जीवंत गांधी म्हणून ओळखतात.ठक्कर बाप्पा यांचा जन्म 29 नोव्हेंबर 1869 रोजी गुजरातमधील भागलपूर (जि. भावनगर) येथे झाला. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण घेतले आणि सरकारी नोकरीत प्रारंभिक काळ घालवला. परंतु 1914 च्या सुमारास ब्रिटिशांच्या अंतर्गत कार्यरत असताना त्यांनी प्रथमच आदिवासी भागात काम केले आणि त्या समाजातील दारिद्र्य, अशिक्षितपणा, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि सामाजिक बहिष्काराचे परिणाम अतिशय जवळून पाहिले. ही निरीक्षणे पुढे त्यांच्या जीवनातील धर्मवळण बनली. गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेखाली त्यांनी नोकरीचा राजीनामा देत वयाच्या ५० व्या वर्षी संपूर्णपणे समाजकार्याला वाहून घेतलेले जीवन सुरू केले. हीच ठक्कर बाप्पांच्या कार्याची खरी सुरुवात होती.त्यांनी भारतातील आदिवासी समाजाकडे सुधारणा किंवा मदतीची गरज असलेल्या जमातींसारखे पाहिले नाही, तर त्या समाजाला भारताचे आदिम नागरिक, संस्कृतीचे वारकरी आणि निसर्गाचे जिवंत शिलेदार म्हणून मान्यता दिली. त्यांच्या कार्याची मुळे सामाजिक न्याय, समता, अहिंसा आणि मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांमध्ये खोलवर रोवली गेली होती. ते म्हणत "ज्या समाजाला आपण मदत करत आहोत, तो गरिब आहे म्हणून नव्हे, तर त्याच्यात प्रचंड सांस्कृतिक वारसा आहे म्हणून त्याला साथ देणे आवश्यक आहे."ठक्कर बाप्पांनी मानवसेवेला कोणतेही राजकारणाचे स्वरूप दिले नाही. देशभरात त्यांनी 400 हून अधिक संस्था, शाळा, गुरुकुल, पुनर्वसन केंद्रे, वसतिगृहे आणि आश्रमशाळा उभारल्या. सुरुवातीला गुजरात, नंतर महाराष्ट्र, आदिवासी बहुल विदर्भ, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि उत्तर भारतात त्यांनी कामाचा व्याप्तीक्षेत्र विस्तारत नेला. भारतातील भटक्या आणि विमुक्त जमाती त्या काळी British Criminal Tribes Act-१८७१ अंतर्गत जन्मजात गुन्हेगार म्हणून घोषित होत्या. हे अन्यायकारक कायदे आणि सामाजिक बहिष्कार ठक्कर बाप्पांना अमानुष वाटत होते. त्यांनी या समाजाच्या पुनर्वसनासाठी मोठ्या प्रमाणात मोहीम राबविली. पुनर्वसनशिबिरे, शिक्षण, आरोग्यसेवा, शेतीप्रशिक्षण, आणि स्वावलंबनासाठी उद्योगप्रशिक्षण उपलब्ध करून दिले.आदिवासी भागातील महिलांची स्थिती अत्यंत दयनीय होती. त्या शिक्षणापासून, आरोग्यसेवेपासून आणि सामाजिक समानतेपासून वंचित होत्या. ठक्कर बाप्पांनी महिला सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांना वाटत होते की समाज बदलायचा असेल तर महिला आणि मुलांचे शिक्षण अत्यावश्यक आहे. म्हणून त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा सुरू केल्या. ग्रामीण भागातील पारंपरिक जन्ममृत्यू विधी, मातृआरोग्य, अपोषण, व्यसनाधीनता आणि रोगप्रतिबंधक उपाययोजनांना त्यांनी प्रोत्साहन दिले.ठक्कर बाप्पांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आदिवासी भागात जलसंधारण, सिंचन, शेतीसुधारणा, हस्तकला, विणकाम, बागायती, पशुपालन आणि उद्योगक्षेत्रात देखील कार्य केले. त्यांच्या कार्यातून जन्माला आलेल्या उद्योग केंद्रांनी अनेक आदिवासी कुटुंबांना स्वावलंबन दिले. त्यांच्या दृष्टीने सेवा म्हणजे केवळ दान नव्हे तर सक्षमीकरण, आत्मनिर्भरता आणि स्वाभिमान निर्माण करणे हा उद्देश होता. ते म्हणत: "ज्याला आपण मदत देतो, त्याच्या आत्मसन्मानाची राख राखली पाहिजे, मशाल देणे हे भिक मागण्यापेक्षा श्रेष्ठ आहे."त्यांनी सुरू केलेला "भिल सेवा मंडळ", "भील सेवा संघ", तसेच नंतर स्थापन झालेले "ठक्कर बाप्पा आदिवासी विकास महामंडळ" यासारख्या उपक्रमांनी आदिवासी समाजात नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजाच्या शिक्षणात वाढ, आरोग्यात सुधारणा, अंधश्रद्धेपासून मुक्ती, कायदेशीर हक्कांविषयी जागरूकता आणि आर्थिक विकास शक्य झाला.भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी अप्रत्यक्षपणे योगदान दिले. गांधीजींच्या असहकार आंदोलनात सहभागी होताना त्यांचे सामाजिक कार्यच सत्याग्रहाचे रूप घेतले. गांधीजी म्हणाले होते:"जर मी स्वतःला गांधी मानत असेन तर ठक्कर बाप्पा हे प्रत्यक्ष गांधी आहेत."1951 साली ठक्कर बाप्पा यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य थांबले नाही. त्यांनी निर्माण केलेल्या चळवळी, संस्थात्मक पायाभूत रचना आणि विचारधारा आजही सरकारी पातळीवर आणि स्वयंसेवी क्षेत्रात मार्गदर्शक ठरतात. आज हजारो आश्रमशाळा, विद्यार्थी वसतिगृहे, आदिवासी विकास महामंडळे आणि शासकीय धोरणे त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन कार्यरत आहेत.

ठक्कर बाप्पांचे जीवन आपल्याला स्मरण करून देते की समाजातील दुर्लक्षितांसाठी काम करणे म्हणजे केवळ दानधर्म नव्हे, तर समतेची आणि मानवतेची उभारणी करणे होय. त्यांच्या कार्यातून हे सिद्ध झाले की नियोजनबद्ध सेवा, मानवी दृष्टीकोन, सन्मानाधारित सुधारणा आणि लोकशाही मूल्ये या आधारे सामाजिक बदल साधता येऊ शकतो. आज जेव्हा समाज पुन्हा जात, धर्म, आर्थिक विषमता, अंधश्रद्धा आणि असमानतेच्या आव्हानाला सामोरे जात आहे, तेव्हा ठक्कर बाप्पांचे कार्य अधिक अर्थपूर्ण वाटते.त्यांची जयंती म्हणजे केवळ स्मरणाचा दिवस नसून मानवता, समर्पण, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादिवस आहे. ठक्कर बाप्पांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या सुरू केलेल्या कार्याचा वारसा पुढे नेणे, आदिवासी समाजाला केवळ शासकीय लाभांच्या चौकटीत न ठेवता त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे आणि त्यांच्या संस्कृतीला सन्मानाने स्थान देणे.आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा पुनरुच्चार केला पाहिजे,"मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही, आणि सेवेशिवाय मानवता अपूर्ण आहे."



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
मो. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २९ नोव्हेंबर २०२५

# व्यक्तिपूजा हा अध:पतन आणि हुकूमशाहीकडे जाणारा मार्ग आहे - प्रा. रामचंद्र गुहा




“खरं सांगायचं तर, जर नवीन संविधानानुसार गोष्टी चुकीच्या घडल्या, तर त्याचे कारण आपले संविधान वाईट होते असे नाही. त्यावेळी आपल्याला हेच म्हणावे लागेल की, माणूस अधम होता.” - डॉ. बी.आर. आंबेडकर (नोव्हेंबर 1948 मध्ये भारताच्या संविधान सभेत बोलताना.)भारतीय संविधान 26 जानेवारी 1950 रोजी लागू झाले. त्यामुळे, या आठवड्यात त्या युगप्रवर्तक घटनेला 75 वर्षे पूर्ण होत आहेत. सध्या सत्तेवर असलेल्या राजकारण्यांसाठी हा वर्धापन दिन कदाचित मोठा उत्सव, मिरवणूक आणि आत्म-स्तुतीचा प्रसंग असेल. परंतु, मसुदा समितीचे अध्यक्ष आणि कायदा मंत्री डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी संविधान स्वीकारण्यापूर्वी दिलेले काही महत्त्वपूर्ण इशारे आठवून मला हा उत्साह काहीसा संतुलित करायचा आहे. संविधानाची तत्त्वे आणि नियम यांवर तीन वर्षे वादविवाद झाले, त्या काळात आंबेडकरांनी संविधान सभेत अनेक महत्त्वाचे हस्तक्षेप केले. त्यांनी दोन उल्लेखनीय भाषणेही दिली, पहिले 4 नोव्हेंबर 1948 रोजी, मसुदा संविधान सादर करताना आणि दुसरे, जवळपास एका वर्षानंतर, जेव्हा अंतिम दस्तऐवज सभेसमोर सादर करण्यात आले त्यावेळी. या दुसऱ्या भाषणातील एक भाग फार प्रसिध्द आहे, आणि तो पुन्हा पुन्हा सांगण्यासारखा आहे. तो भाग म्हणजे भारतातील व्यक्ति पूजेच्या प्रवृत्तीबद्दल होता. आंबेडकर यांनी आपल्या देशबांधवांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी लोकशाही टिकवण्यास स्वारस्य असलेल्या सर्वांना दिलेला इशारा लक्षात घेण्यास सांगितले. तो इशारा असा होता, “आपले स्वातंत्र्य मोठ्या व्यक्तीच्या चरणी अर्पण करू नका, किंवा त्यांना अशा शक्ती देऊ नका ज्यामुळे त्यांना आपल्या संस्था उलथून टाकणे शक्य होईल.” ते पुढे म्हणतात, “हा इशारा जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा भारतासाठी अधिक आवश्यक आहे. ज्याला भक्ती, निष्ठा किंवा व्यक्तिपूजेचा मार्ग म्हणता येईल, ती जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणात भारताच्या राजकारणात भूमिका बजावते.” ते पुढे म्हणाले, “धर्मातील भक्ती आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकते. पण राजकारणात, भक्ती किंवा व्यक्तिपूजा हा अध:पतन आणि अखेरीस हुकूमशाहीकडे जाणारा निश्चित मार्ग आहे.” डॉ. आंबेडकर यांनी केलेले हे निरीक्षण दूरदृष्टीचे ठरले, कारण ते 1970 च्या दशकातील इंदिरा गांधी आणि आजच्या नरेंद्र मोदी यांच्या व्यक्ति पूजेबद्दल दोन्हीसाठी लागू होते. या व्यक्तिपूजेने भारतीय लोकशाहीचे अध:पतन केले आहे, जरी ते वेगवेगळ्या प्रकारे घडले असले तरी. आंबेडकरांना स्वत:ला कदाचित या अंधभक्तीच्या प्रवृत्तीचा विस्तार राजकारणाव्यतिरिक्त इतर क्षेत्रांमध्ये जसे यशस्वी क्रिकेटपटू, चित्रपट अभिनेते आणि व्यावसायिक यांनाही देवत्व बहाल करण्यापर्यंत वाढेल याचे आश्चर्य वाटले नसेल. परंतु, त्यांच्या स्वत:च्या अनुयायांकडून आज जी त्यांची भक्ती केली जाते, त्यामुळे आंबेडकरांना कदाचित खेद वाटला असता.आंबेडकरांच्या त्या शेवटच्या भाषणातील दुसरा इशाराही वर्तमानासाठी तितकाच प्रासंगिक आहे. हा इशारा म्हणजे “आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीत रूपांतरित केले पाहिजे,” यावर त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. त्यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, “26 जानेवारी 1950 रोजी आपण एका विसंगतीपूर्ण जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकारणात आपल्याकडे समानता असेल आणि सामाजिक व आर्थिक जीवनात आपल्याकडे असमानता असेल. राजकारणात आपण ‘एक माणूस, एक मत आणि एक मत, एक मूल्य’ हे तत्त्व मान्य करू. परंतु, आपल्या सामाजिक आणि आर्थिक रचनेमुळे, सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण ‘एक माणूस, एक मूल्य’ हे तत्त्व नाकारणे सुरूच ठेवू. हा विसंगतीपूर्ण जीवनप्रवास आपण किती काळ सुरू ठेवणार? आपण आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात समानतेला किती काळ नकार देत राहणार?” वैयक्तिक अनुभव आणि अभ्यासपूर्ण संशोधन या दोन्ही माध्यमातून, आंबेडकरांना भारतीय समाज जातीच्या असमानतेमुळे कसा विद्रूप झाला आहे याची सखोल जाणीव होती. लिंग असमानतेबाबत ते त्यांच्या काळातील इतर बहुतेक पुरुष राजकारण्यांपेक्षा अधिक जागरूक होते. दलित आणि महिलांसह सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार देऊन, संविधानाने एक व्यक्ती एक मत या तत्त्वाचे समर्थन केले. तरीही, 75 वर्षांनंतर, एक व्यक्ती एक मूल्याचे तत्व प्रत्यक्षात येण्यापासून खूप दूर आहे. शहर आणि खेड्यात दैनंदिन जीवनात, दलितांविरुद्ध भेदभाव सुरूच आहे. कुटुंबात आणि समुदायात, भारतीय महिलांना भारतीय पुरुषांपेक्षा कनिष्ठ आणि गौण मानले जाते. आणि व्यवसाय आणि व्यवसायांमध्ये, उच्चवर्णीय पुरुषच मोठ्या प्रमाणात वर्चस्व गाजवतात, दलित आणि महिलांना अनेकदा प्रगतीच्या संधी नाकारल्या जातात.राजकारणातील समानता आणि सामाजिक आणि आर्थिक जीवनातील असमानता यातील फरक समोर आणताना, आंबेडकरांनी दलित आणि महिलांचे हक्क प्रामुख्याने लक्षात ठेवले. तथापि, आणखी दोन असुरक्षित गट आहेत ज्यांकडे आंबेडकरांना स्वत: फारसे लक्ष देता आले नाही. ते म्हणजे आदिवासी आणि धार्मिक अल्पसंख्याक. व्हर्जिनियस खाखा, नंदिनी सुंदर आणि फेलिक्स पडेल यांसारख्या मानववंशशास्त्रज्ञांच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, मध्य भारतात राहणाऱ्या आदिवासी समुदायांना 75 वर्षांच्या "संवैधानिक" लोकशाहीमुळे सर्वात कमी फायदा झाला असून तोटा मात्र सर्वात जास्त झाला आहे. त्यांच्या जमिनी, त्यांची जंगले, त्यांची घरे, त्यांची तीर्थस्थळे, औद्योगिक आणि खाण कंपन्यांनी पक्षपाती राजकारण्यांशी संगनमत करून क्रूर हल्ल्यांना बळी पडली आहेत. आदिवासींनी अनुभवलेला वंचितपणा आणि भेदभाव हा दलितांपेक्षाही जास्त आहे, मात्र त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. आपल्या धार्मिक अल्पसंख्यांकांमध्ये, भारतातील मुस्लिमांना स्वातंत्र्याच्या वेळी दिलेल्या आश्वासनांमुळे सर्वात जास्त विश्वासघात झाल्याचे वाटू शकते. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर, लाखो मुस्लिम भारतातच राहिले, त्यांना खात्री होती की तत्कालीन सरकारने त्यांना पूर्ण नागरिकत्व हक्कांची हमी दिली आहे. तरीही, गेल्या काही दशकांपासून आणि विशेषतः मे 2014 पासून, हे अधिकार सातत्याने कमी केले जात आहेत. जानेवारी 1950 पासून भारतीय मुस्लिमांचा छळ, बदनामी आणि थेट छळ आता कधीही नव्हता इतका वाढला आहे. एक व्यक्ती, एक मूल्य हे लोकशाही तत्व त्यांना विशेषत: नाकारले जाते. आंबेडकरांनी संविधान सभेला दिलेल्या शेवटच्या भाषणात व्यक्तिपूजा आणि सामाजिक असमानतेबद्दलचे इशारे थेट भारत आणि भारतीयांना आज कुठे आहेत हे सांगतात. काही वर्षांपूर्वी, त्यांनी दूरदर्शी पण दुर्लक्षित असलेल्या इशाऱ्याबद्दल सांगितले होते. विशेषतः "संवैधानिक नैतिकता" जोपासण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला होता. आंबेडकरांनी 19 व्या शतकातील इतिहासकार जॉर्ज ग्रोट यांचे उद्धरण उद्धृत केले, ज्यांनी "पक्षीय स्पर्धेच्या कटुतेत प्रत्येक नागरिकाच्या मनात एक परिपूर्ण आत्मविश्वास असतो की संविधानाचे स्वरूप त्यांच्या विरोधकांच्या नजरेत त्यांच्या स्वत:च्या नजरेपेक्षा कमी पवित्र राहणार नाही" अलीकडील दशकांचा पक्षपातीपणा, ज्यात भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस दोन्ही एकमेकांच्या हेतूंबद्दल तितकेच साशंक आहेत, हे दर्शवितो की आज भारत त्या लोकशाही आदर्शापासून किती दूर आहे. आंबेडकरांना कदाचित याचे पूर्णपणे आश्चर्य वाटले नसेल. कारण, नोव्हेंबर 1948 च्या त्या भाषणात त्यांनी निरीक्षण नोंदवले होते: “घटनात्मक नीतिमत्ता ही नैसर्गिक भावना नाही. ती जोपासावी लागते. आपल्या लोकांना ती अजून शिकायची आहे हे आपण ओळखले पाहिजे. भारतातील लोकशाही ही केवळ भारतीय मातीवर केलेली वरवरची सजावट आहे, कारण ही माती मूळतः अलोकतांत्रिक आहे.” आंबेडकरांनी पुढे म्हटले की, “प्रशासनाच्या स्वरूपात केवळ बदल करून संविधानाचे स्वरूप न बदलता त्याची मोडतोड करणे आणि ते संविधानाच्या मूळ भावनेशी विसंगत व विरुद्ध बनवणे पूर्णपणे शक्य आहे.” हे देखील दुर्दैवाने प्रत्यक्षात आले आहे. इंदिरा गांधींच्या काँग्रेसनेच "कटिबद्ध नोकरशाही" आणि "कटिबद्ध न्यायव्यवस्था" ला प्रोत्साहन देऊन आदर्श निर्माण केला. 2014 नंतर मोदी सरकारने या धोकादायक कल्पनांना खूप पुढे नेले आहे. त्यांनी नागरी सेवा, पोलिस, तपास संस्था, नियामक संस्था, न्यायपालिका आणि निवडणूक आयोग यांना त्यांच्या स्वातंत्र्यापासून मुक्त करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या राजकीय अजेंड्याखाली आणण्यासाठी अतिरिक्त काम केले आहे. त्यांनी आपल्या सशस्त्र दलांमध्ये धार्मिक बहुसंख्यवादाचे विष ओतण्याचाही प्रयत्न केला आहे.डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेला दिलेल्या त्यांच्या शेवटच्या भाषणाचा समारोप जेथे केला, त्याच निष्कर्षाने मी माझा हा लेख संपवतो. आपल्या समारोपाच्या टिप्पणीत आंबेडकर म्हणाले: “आपण हे विसरता कामा नये की या स्वातंत्र्याने आपल्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे.” ते पुढे म्हणाले: “स्वातंत्र्यामुळे, काहीही चुकीचे घडल्यास ब्रिटिशांना दोष देण्याचे निमित्त आपण गमावले आहे. यापुढे जर काही गोष्टी चुकीच्या घडल्या, तर स्वत:शिवाय दोष देण्यासाठी आपल्याकडे कोणीही नसेल.” आज पंच्याहत्तर वर्षांनंतर, आपल्या समस्यांसाठी इतरांना दोष देण्याची सवय आंबेडकरांच्या काळापेक्षा जास्त सामान्य झाली आहे. सध्याच्या सरकारच्या काळात, आपल्या स्वत:च्या उणीवांची जबाबदारी टाळण्याची पद्धत आणखी प्रचलित झाली आहे. मुघल, ज्यांचे राज्य शतकांपूर्वी संपुष्टात आले (आणि जे त्यांच्या शिखरावर असतानाही आजच्या भारताचा बराचसा भाग व्यापत नव्हते); ब्रिटिश, ज्यांनी 1947 मध्ये देश सोडला; आणि 1964 मध्ये निधन झालेले जवाहरलाल नेहरू हे तीनही काळाच्या आड झालेले घटक, एकल किंवा एकत्रितपणे, अशा गोष्टींसाठी जबाबदार धरले जातात. ज्या एका स्वदेशी आणि आत्मनिर्भर म्हणवणाऱ्या सरकारने स्वत:च पूर्ण केलेल्या नाहीत.

**लेखक : प्रा. रामचंद्र गुहा हे भारतीय इतिहासकार आहेत.**
**अनुवाद: प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.**
**सौजन्य: जनता विकली : 23 फेब्रुवारी 2025**